


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २८४ वा | सोमवार दि. १३ जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जय जिजाऊ जय घोषाने दुमदुमले मातृतीर्थ !

## राजमाता जिजाऊ यांचा ४२७ वा जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा



**जनसंचलन/बुलढाणा**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांचा आज जन्मदिवस असून त्यांच्या ४२७ व्या जयंतीनिमित्त सिंदखेड राजा येथील जन्मस्थळी ङ्गराजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळाफ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सुर्योदयावेळी शासकीय महापुजा करण्यात आली. पुरातत्व विभाग, नागपूर, सिंदखेड राजा नगरपरिषद आणि मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर, खासदार सुप्रिया सुळे, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार मनोज कायंदे, लखुजीराजे जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव, माजी आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, शशिकांत खेडेकर




जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी सदाशीव शेलार, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, तहसिलदार, मुख्याधिकारी यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थळाचे दर्शन घेवून अभिवादन केले. महापुजा पार पडल्यानंतर केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, सिंदखेड राजा नगरीमध्ये राजमाता जिजाऊ यांचा ४२७ वा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या जन्मोत्सवासाठी दरवर्षीप्रमाणे देशभरातून लाखो लोक राजमाता जिजाऊ यांच्या दर्शनासाठी येत असतात. मॉ जिजाऊ साहेब यांच्या रुपाने सिंदखेड राजा नगरीला आदर्श माता, पूत्र घडविणारी राष्ट्रमातेची नगरी म्हणून जगभरात दर्जा प्राप्त झाल्याचे सांगून राजमाता जिजाऊ जयंतीच्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

## राजमाता जिजाऊ जन्मोत्सव हा लोकोत्सव व्हावा - कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर



राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवानिमित्त कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते शासकीय पुजा करण्यात आली. त्यावेळी ते माध्यमांशी बोलतांना म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सव हे महाराष्ट्रातील भक्तांसाठी दर्शनाची वर्षभराची शिदोरी असते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दर्शन घेण्यासाठी आलो. राजमाता जिजाऊ जन्मोत्सव हा लोकोत्सव व्हावा यासाठी आगामी काळात प्रयत्न करणार आहोत. लखुजीराजे जाधव राजवाडा या मॉ जिजाऊ जन्मस्थळासंदर्भातील विकास कामांमधील अडचणी दूर करुन आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे यासाठी प्रयत्न करणार आहे. राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवाला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापुजा करण्यासंदर्भात मंत्रिमंडळात प्रस्ताव मांडण्यात येईल. सिंदखेड राजा विकास आराखड्याला गती देण्यात येईल, असे कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

## ...विद्युत रोषणाई, फुलांच्या माळांनी सजले मातृतीर्थ...



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांचा आज जन्मदिवस आहे. जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथील राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात राजमाता जिजाऊंचा जन्म झाला होता. दरवर्षीप्रमाणे या जन्मस्थळी मोठ्या उत्साहात राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळा साजरा केला जातो. या सोहळ्यानिमित्त राजमाता जिजाऊंचे जन्मस्थळ असलेला लखुजीराजे जाधव यांचा राजवाड्याची आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांच्या माळांनी सजावट करण्यात आली होती.

## शाळकरी विद्यार्थांमध्येही उत्साह



राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यात हजारो जिजाऊप्रेमींची गर्दी होती. या सोहळ्यात शाळकरी मुलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग नोंदवला होता. यावेळी मॉ जिजाऊ जन्मोत्सवाचा शाळकरी विद्यार्थांमध्येही उत्साह दिसून येत होता.

# शहर पत्रकार संघाच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊंना अभिवादन

## जिजाऊंच्या व्यापक दृष्टीकोनातूनच आधुनिक शिवबा घडतील : डॉ. वैशाली निकम

जनसंचलन/बुलढाणा

प्रतिकुल परिस्थितीला अनुकुल बनवत उपलब्ध संसाधनांमध्ये क्रांती घडविता येते हा आदर्श राष्ट्रमाता जिजाऊंनी बालवयातच शिवबांना दिला. आपल्या दु: खाला संकट मानायचे की संधी हे आपण जिजाऊ चरित्रातून शिकायला हवे, भावनांचे व्यवस्थापन, जिजाऊंचा व्यापक दुरदुष्टीकोनातूनच आधुनिक शिवबा घडतील, असे प्रतिपादन डॉ. वैशाली निकम यांनी केले. स्थानिक पत्रकार भवनात बुलढाणा शहर पत्रकारसंघाच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊंना अभिवादन करण्तात आले. यावेळी आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजितसिंग राजपूत, प्रमुख अतिथी म्हणून शिवजयंती उत्सव समितीचे माजी अध्यक्ष डॉ. शोण चिंचोले, महाभूमिचे कार्यकारी संपादक ब्रम्हानंद जाधव, शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार नरेंद्र ठाकरे, उर्मिला दिदी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ. वैशाली निकम म्हणाल्या की, जे पालकत्वाचं बीज जिजाऊंनी पेरले आहे त्याला आपण आपल्या विचारांचे आणि वेळेचे खतपाणी घालून सुंदर रोपटे तयार करु शकतो. जिजाऊंच्या चरित्रातून आपण पालक आणि व्यक्ती म्हणून काय शिकतो, याची अंमलबजावणी करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने जिजाऊंना अभिवादन होय. तर ठाणेदार नरेंद्र ठाकरे यांनी छत्रपती शिवरायांचा आदर्शच युवकांना यशापर्यंत घेऊन जाणारा असल्याचे सांगितले. याप्रसंगी जिल्हा पत्रकार संघाच्या महिला अध्यक्ष मृणाल सावळे, राजेश डिडोळकर, भानुदास लकडे, अजय राजगुरे, सुनिल मोरे, अली रहमत शहा, अजय काकडे, अभय जंगम, आकाश भालेराव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शेख जफर यांनी तर आभार अनिकेत गवळी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शहर कार्यकारिणे परिश्रम घेतले.



**महापुरुषांना अभिप्रेत असणारे पत्रकारसंघाचे अभिवादन : डॉ. शोण चिंचोले**

महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या विचारांना उजाळा देऊन ते आत्मसात करणे याला जिल्हा पत्रकार संघाने दिलेला प्राधान्यक्रम निश्चितचं कौतुकास्पद असल्याचे डॉ. शोण चिंचोले म्हणाले. हिंदु - मुसलिम ऐक्य शिवकाळातही होते आणि आजही ते कायम असून या कार्यक्रमात उपस्थित असलेले मुसलिम मावळे त्याची प्रचिती देतात असेही त्यांनी सांगितले.

# महापुरुषांचे विचार कायम समाजाला प्रेरणा देतात - देविदास शर्मा

जनसंचलन/खामगाव

स्थानिक सतिफैल भागातील श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा आज दिं १२-१-२०२५ रविवार रोजी सकाळी ११ वा मंडळाच्या संस्थापक एकनिष्ठ संचालिका सौ पार्वती बाई सुकाळे यांच्या घरी राष्ट्रमाता. राजमाता माँ जिजाऊ यांच्या प्रतिमेला व लोक माता पुण्यश्लोक देवी श्रीअहिल्यादेवी होळकर,ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला कुंकुम तिलक लावून. पुष्पहार अर्पण करून विधिवत पुजन करून माँ जिजाऊ वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले या वेळी बुध्दी आणि युक्ती च्या जोरावर माँ साहेब जिजाऊंनी अशक्य ते शक्य करून दाखविले स्वराज्य निर्माण केले. स्वामी विवेकानंदानी ध्येय पुर्ती होईपर्यंत थांबु नका असा संदेश दिला महापुरुषांचे विचार व कार्य समाजाला कायम प्रेरणा देत असतात असे प्रतिपादन संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा यांनी केले राजमाता माँ जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली या वेळी ते बोलत होते . जिजाऊ वंदना घेऊन




अल्पोपहार ,चहा वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली या प्रसंगी जेष्ठ साहेबराव सुकाळे, महादेवसर सुकाळे, भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा,विनोद सुकाळे, आशाबाई अंधारे, सुशिला आवलकर,पार्वतीबाई सुकाळे,मंगला बावस्कर, शकुंतला ढवळे,जयाबाई सुकाळे, जयश्री झापर्डे, रजनी सुकाळे, आरती सुकाळे,मंजरी सुकाळे, भक्ती सुकाळे, धनश्री सुकाळे, भुमी सुकाळे, स्वाती ठोसर, गुंजा ठोंबरे, संध्या ठोंबरे, सिध्दिका निवल,लाडो यादव, आशा इटनारे, पुजा इटनारे, प्रिया यादव, आदींची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विनोद सुकाळे यांनी केले अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली

# पती पत्नीवर हल्ला गुन्हा दाखल

जनसंचलन/ नांदुरा

जागेच्या वादातून पती पत्नीवर प्राणघातक हल्ला केल्याची घटना तालुक्यातील माटोडा येथे ३ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता घडली होती. या घटनेत पती गंभीर जखमी झाला होता. याप्रकरणी पत्नीच्या तक्रारीवरून नांदुरा पोलिसांनी तिघा आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले होते. दरम्यान वैद्यकीय प्रमाणपत्रावरून पोलिसांनी गुरुवारी हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी कलम वाढवले आहे. तालुक्यातील माटोडा येथील ज्ञानदेव खराटे व मधुकर खराटे या शेजारी राहणाऱ्या दोन कुटुंबात वाद सुरू आहेत. ३ जानेवारी रोजी ज्ञानदेव खराटे हे त्यांच्या जागेत लाकडी खूट रोवत असताना मधुकर खराटे यांनी वाद घातला हाता. मारहाणीत ज्ञानेश्वर खराटे जखमी झाले होते.



# खुरमपूर जि. प. शाळेचा विद्यार्थी यशराज कृष्णा राठोड निबंध लेखन स्पर्धेत बुलढाणा जिल्ह्यात प्रथम

जनसंचलन/ लोणार

नुकत्याच जिजाऊ स्कूल ऑफ स्कॉलर्स अँड सायन्स कॉलेज आवार, खामगाव येथे दिनांक ९आणि १० जानेवारी रोजी पार पडलेल्या जिल्हा स्तरीय ५२ व्यां विज्ञान प्रदर्शनात आयोजित केलेल्या जिल्हा स्तरीय निबंध लेखन स्पर्धेत आपल्या यशाची परंपरा कायम ठेवत लोणार तालुक्यातील दुर्गम भागातील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा खुरमपुर या शाळेचा विद्यार्थी यशराज कृष्णा राठोड याने उत्कृष्ट निबंध लेखन करून बुलढाणा जिल्ह्यात सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला . खुरमपूरच्या जिल्हा परिषद शाळेसाठी ही अभिमानाची बाब असून यशराज चे सर्वत्र कौतुक होत आहे. लोणार पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी जंगलसिंग राठोड तसेच देऊळगाव कुंडपाल केंद्राचे केंद्रप्रमुख रामप्रसाद कायंदे सर यांनी यशराज चे अभिनंदन केले. शाळेतही एक गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला व यशराज चे शाल पुष्पगुच्छ व भेटवस्तु देऊन मुख्याध्यापक राम चव्हाण व सर्व शिक्षकांनी अभिनंदन आणि गौरव केला. याप्रसंगी मार्गदर्शक विज्ञान शिक्षक विठ्ठल दत्तराव चाटे सर यांचाही शाळेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.या प्रसंगी सर्व विद्यार्थी तसेच उच्चश्रेणी मुख्याध्यापक राम चव्हाण राठोड मादनकर विलास आढाव







ऐनलावर दुगमवार नेवरे नागेश वारे श्केशव चोंडे विठ्ठल चव्हाण कविता चव्हाण उपस्थित होते.

# केंद्रीय राज्यमंत्री यांच्या हस्ते प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे उद्घाटन

## खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा व स्वच्छतेला प्राध्यान्य द्यावे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

**जनसंचलन/बुलढाणा**

रस्त्यावरील खाद्यपदार्थ हे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशा-चे एक जिवंत उदाहरण असून प्रत्येक वर्गातील व्यक्ती आवडीने खातात. खाद्यप्रेमी अन्न सुरक्षा, स्वच्छता व पोष्टिक पदार्थांना प्राध्यान्य देत आहे. त्यामुळे खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा व स्वच्छतेला प्राध्यान्य द्यावे, असे आवाहन केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्चिम क्षेत्रमार्फत येथील सहकार विद्या मंदिर शाळेच्या सभागृहात ङ्गसंकल्प स्वच्छ आहारफ्ळपक्रमांतर्गत खाद्य विक्रेत्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्चिम क्षेत्राचे संचालक प्रिती चौधरी, मुख्यालय दिल्लीचे संचालक डॉ. रविंद्र सिंग, आयुष विभागाचे प्रा. डॉ. योगेश शिंदे, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचे सहायक संचालक ज्योती हरणे, संचालक अजय खैरनार, निलेश धंदाळे, शुभांगी निकम आदी उपस्थित होते. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, बुलढाणा जिल्ह्याला धाार्मिक व ऐतिहासिक स्थळाचा वारसा लाभला आहे. या ठिकाणाला अनेक देशी व विदेशी पर्यटक भेटी देतात. त्यांना स्थानिक पदार्थांचे मोठे आकर्षण असतात. त्यामुळे या पदार्थांची मोठी मागणी होत असून स्थानिकांना लाभ होतो. पर्यटक अन्न सुरक्षा व स्वच्छतेला प्राध्यान्य देतात. त्यामुळे प्रत्येक विक्रेतांनी स्वच्छता, सुरक्षतेकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. प्रशिक्षणामध्ये सांगितलेल्या बाबीचा आपल्या व्यवसायात अवलंब करुन अन्न सुरक्षा मानकाचे पालन करावे. जिल्ह्यामध्ये अनेक पदार्थ नावलौकीक असून शेगांव कचोरीप्रमाणे नवन-वीन प्रयोगातून पदार्थांची बँडींग करावी. खाद्य विक्रेतांसाठी शासन अनेक योजना राबवित आहे. स्वनिधी योजनाच्या माध्यमातून अल्प दरात कर्ज उपलब्ध करुन दिला जातो. या योजनेचा लाभ घेऊन खाद्य विक्रेतांनी आपला व्यवसाय मोठा करावा. खाद्य विक्रेतांनी खाद्य पदार्थ तयार करणेपर्यंत सिमीत न राहता त्यांचे पॅकींग, मार्केटींग व बँडींगवर भर द्यावा. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाव्दारे देशभरात खाद्य विक्रेत्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम राबवित आहे. या प्रशिक्षणाचा जिल्ह्यातील सर्व बचत गट, रस्त्यावरील खाद्य विक्रेतांनी लाभ घेऊन ग्राहकांना सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार खाद्यपदार्थ उपलब्ध करुन द्यावे. जंग फुडमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना पोष्टीक व सात्वीक आहाराला देत असून केंद्र शासनही आयुष आहाराला प्रोत्साहन देत आहे. आयुष आहारामुळे विविध आजारांपासून बचाव असून शारीरिक, मानसिक स्वास्थासाठी आवश्यक आहे. त्यामुळे खाद्य विक्रेंते व बचत गटानी आयुष आहाराला प्राध्यान्य देऊन जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिप प्रज्वलन करुन खाद्य विक्रेतांचे



प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे उद्घाटन केले. त्यानंतर राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेच पुजन करुन अभिवादन करण्यात आले. प्रशिक्षणाला आलेले विक्रेते व बचत गटातील महिलांना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सेप्टी किटचे वाटप करुन उपस्थितांना अन्न सुरक्षा व स्वच्छतेसंदर्भात प्रतिज्ञा दिली. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचे फोस्टॅक प्रशिक्षक डॉ. रामेश्वर जाजू व प्रियंका सूर्यवंशी यांनी वैयक्तिक स्वच्छता, सुरक्षित अन्न हाताळणी, अन्न भेसळ आणि अन्न सुरक्षा आणि स्वच्छता मानके याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्चिम क्षेत्राचे संचालक प्रिती चौधरी यांनी केले. तर सुत्रसंचालन सहायक संचालक अजय खैरनार यांनी केले. यावेळी बचत गटाच्या महिला व रस्त्यावर खाद्यपदार्थ विकणारे २००० पेक्षा जास्त विक्रेते सहभागी झाले होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हाधिकारी कार्यालयात राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याव-ेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनीही



राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## रविकांत तुपकर परिवारासह जिजाऊंच्या चरणी लीन...!

**जनसंचलन/बुलढाणा**



शेतकरी नेते रविकांत तुपकर हे सिंदखेडराजा येथील राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या चरणी (जन्मस्थळी) राजवाड्यावर परिवारासह नतमस्तक झाले.तुपकरांनी जिजाऊ सृष्टीवर जाऊन पुस्तकांच्या आणि इतरही स्टॉलला भेटी दिल्या. पुस्तकांची भरपूर खरेदी केली.ठेचा भरीत बेसन भाकरीचा जमिनीवर बसून आस्वाद घेतला. राज्यभरातून आलेल्या हजारो जिजाऊ भक्तांच्या तुपकरांसोबत भेटीगाठी झाल्या आणि मनमोकळा संवादही झाला. शिवश्री पुरुषोत्तमजी खेडेकर आणि रेखाताईंशी तुपकर दाम्पत्यांची भेट होऊन मनमोकळी चर्चा झाली. रविकांत भाऊंची मुलगी कु. यज्ञजा व पत्नी अँड. शर्वरीताई आणि त्यांचे जीवलग सहकारी श्री. विनायक सरनाईक, राम अंभोरे, बाळूशेठ शेवाळे, कैलास मेहेत्रे, विनायक पाटील, मधुकर शिंगणे, प्रदीप हिवाळे, संतोष शिंगणे, गजूभाऊ चव्हाण, कृष्णा मेहेत्रे, विशाल चौधरी, नामदेव खांडेभराड, आकाश पाटील, प्रदीप मेहेत्रे, अनिल दे-वरे, गजानन डीघोळे, सतीश वायाळ, नितीन सानप यांनी आजचा संपूर्ण दिवस जिजाऊ माँसाहेबांच्या चरणी अर्पण केला. सत्यपाल महाराजांच्या कीर्तनाचा तुपकर दाम्पत्याने आनंद घेतला. आजच्या जिजाऊ जन्मोत्सवाने लढण्यासाठी नवी प्रेरणा, उमेद आणि उर्जा मिळाली. सृष्टीवरून विचारांचे सोने लुटून आल-ो अशी भावना रविकांतभाऊंनी यावेळी बोलतांना व्यक्त केली!



# जे नियमात बसत नाहीत, त्यांनी स्वत:हून नावं काढा, अन्यथा दंडासह...

## लाडकी बहीण योजनेवरून छगन भुजबळांचं मोठं वक्तव्य...

**वृत्तसंस्था/नाशिक**

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी नेते, आमदार छगन भुजबळ यांनी लाडकी बहीण योजनेवरुन मोठं वक्तव्य केलं आहे. लाडकी बहीण योजनेच्या नियमात जे बसत नाहीत, त्यांनी स्वत:हून आपली नावं मागे घ्यावीत. अन्यथा त्यांच्याकडून दंडासह रक्कम वसूल करता येईल, असं वक्तव्य छगन भुजबळ यांनी केलं आहे. त्याशिवाय भविष्यात लाडकी बहीण योजनेचे नियम अधिक कठोर होणार असल्याचे संकेतही त्यांनी दिले आहेत. लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना भुजबळ म्हणाले, लोकांना असं आवाहन करायला हवं, की जे नियमात बसत नाहीत, त्यांनी स्वत:हून आपली नावं काढा, असं महिलांना सांगायला हवं. आतापर्यंत लाडकी बहीण योजनेतून जे पैसे मिळाले, सरकारकडून जे पैसे त्यांना देण्यात आले ते परत मागण्यात काहीही अर्थ नाही. ज्या महिला नियमांत बसत नाहीत, त्यांच्याकडून आधी दिलेले पैसे परत मागू नयेत. मात्र यापुढे या नियमांत ज्या महिला बसत नाहीत, त्यांनी स्वत:हून आपली नावं काढून घ्यावीत, असं लोकांना सागावं. अन्यथा दंडासह वसुली करता येईल. मागचं जे झालं, ते आपण आपल्या लाडक्या बहिणींना अर्पण करुन टाकलं, असं म्हणत त्यांनी आगामी काळात लाडकी बहीण योजनेचे नियम अधिक कठोर होणार असल्याचे संकेत दिले आहेत. विधानसभेच्या तोंडावर महायुती सरकारने लाडकी बहीण योजना जाहीर केली. जुलै २०२४ पासून २१ ते ६५ वर्षांच्या महिलांना लाडकी बहीण योजनेअंतर्गत १५०० रुपये दिले जात आहेत. मात्र ही योजना सरसकट सर्व महिलांसाठी नाही. या योजनेसाठी सरकारने काही नियम जारी केले आहेत. कुटुंबाचं उत्पन्न अडीच लाखांहून अधिक नसावं, चारचाकी नसावी, एका घरात दोन महिलांना हा लाभ घेता येत नाही, असे काही नियम आहेत. या नियमांत ज्या महिला बसतील, त्यांनाच या योजनेचा लाभ घेता येईल. मात्र असं असतानाही अनेक महिलांनी नियमांत बसत नसतानाही लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला आहे. विधानसभा निवडणुकीत



लाडक्या बहिणींनी महायुतीला मोठं यश मिळवून दिलं. विधानसभा निवडणुकीनंतर सरकारने ज्या महिला लाडकी बहीण योजनेच्या नियमांत बसत नाहीत, त्यांना या योजनेतून वगळणार असल्याचं सांगितलं. यावरुनच छगन भुजबळ यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

## सुनेकडून छळ, सासूची आत्महत्या



**जनसंचलन/ शेगाव**

घरगुती कारणावरून वाद होऊन एका ५० वर्षीय महिलेने आत्महत्या केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी सुनेने सासुचा छळ करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप करीत पोलिसात तक्रार दाखल केली आहे. त्यावरून पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शहरातील सरकारी फैलातील आदेश सुधीर कुमकुले (२३) याने शहर ठाण्यात तक्रार दिली. त्यामध्ये त्याच्या वहिनी रुपाली कल्पेश कुमकुले हिने तिची आई चंदाबाई अशोक गायकवाड (रा. निमसगाव), वडील अशोक डिगांबर गायकवाड, भाऊ शिवा अशोक गायकवाड यांच्या सांगण्यावरून घरातील कामाच्या कारणावरून आईला घरातील शौचालयामध्ये कोंडून तसेच नेहमी मारहाण करू शारीरिक व मानसिक त्रास दिला, तसेच आई मंदा सुधीर कुमकुले (५०) हिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने तिने विषारी औषध घेऊन आत्महत्या केली. ही घटना १० जानेवारी रोजी घडल्याचे तक्रारीत म्हटले. पोलिसांनी चारही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ४९, ११५ (२), ३५२, ३५१ (२) (३) ३ (५) नुसार गुन्हा दाखल केला.

## कोणाचीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही-आमदार सिद्धार्थ खरात यांचे प्रतिपादन

**जनसंचलन/मेहकर**

दहशतवाद, दडपशाही, गुंडशाहीने राजकारण करण्यात आले; मात्र आता गुंडप्रवृत्ती, दडपशाही खपवून घेतली जाणार नसल्याचा इशारा आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिला आहे. मेहकर तालुक्यातील उकळी सुकळी येथे गुरुवारी कार्यक्रमात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, येथील सुज्ञ मतदारांनी मला निवडून दिले, त्याचा आनंद आहे; पण त्याहीपेक्षा जास्त आनंद आहे तो म्हणजे जातीपातीच्या राजकारणाला जनतेने थारा दिला नाही. आता सर्वांना सोबत घेऊन विकासाचे राजकारण करायचे आहे. कोणी आडवा आला तर त्याला जसेच्या तसेच उत्तर दिले जाईल. केंद्रात आणि राज्यात कोणाचेही सरकार असले तरी मात्र मेहकर मतदारसंघात आपले राज्य आहे, तसेच रखडलेल्या कामांची चौकशी करण्यात येईल. कोणालाही सोडणार नाही, असाही इशारा आमदार सिद्धार्थ खरात यांनी यावेळी दिला. माझ्या डोक्यात अजून आमदारकी येईना आणि त्यांच्या डोक्यातली कार्यक्रमात बोलताना आ. सिद्धार्थ खरात. आमदारकी काही जाईना, असा टोलाही त्यांनी नाव न घेता माजी आमदार संजय रायमुलकर यांना लागावला. यावेळी उद्धवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शिवसेना आशिष रहाटे, शहरप्रमुख किशोर गारोळे, तालुकाध्यक्ष निंबाभाऊ पांडव, दत्ता घनवट, ॲड. आकाश घोडे, ॲड. संदीप गवई, प्रदीप बिल्लोरे पाटील, ऋषी जगताप, अमोल जगताप यांच्यासह अनेक महाविकास आघाडीचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अमोल बोरे, दशरथ बोरे, सुरेश सोनवणे, राजू धांडे, पंजाब जाधव, अशोक सवडतकर, अनिल बोरे यांनी परिश्रम घेतले.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958